**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राम रुस्तुमराव लांडे,<br>रा. होळकरनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अंबड,<br>जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कार्यालय, अंबड,<br>जिल्हा जालना - श्री. एन. जी. कुमावत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०१-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२३-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००८ रोजी कळविले की, माहिती तयार आहे व कार्यालयात उपस्थित राहून त्याची पाहणी करावी व त्याचप्रमाणे केंद्र स्तर व शाळास्तर माहितीशी संबंधित प्राधिकारी हे जन माहिती अधिकारी असल्याने संबंधित माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. त्याप्रमाणे मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा (सर्व), तालुका अंबड यांना कळविण्यात आले आहे. अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेतली नाही असे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम रुस्तुमराव लांडे, रा. होळकरनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कार्यालय, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विकासकुमार बागडी,<br>नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना<br>- प्रतिनिधी - श्री. ए. जी. कौरवाळ, उप अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी. आर. राणे, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-१२-२००८<br>प्रत जोडलेली नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस या प्रकरणाबाबत आयोगास काहीही सांगता आले नाही ही बाब गंभीर आहे याची आयोगाने नोंद घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती दिलेली आढळून येत नाही असे सांगितले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १७-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसात माहिती द्यावी. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे रुपये २५,०००/- इतकी शास्ती लावण्याची तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) याप्रमाणे कारवाई करण्याची शिफारस केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (१) मधील तरतुदीनुसार माहिती देण्यास कसूर केल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित अधिकारी / कर्मचारी अधिनियमातील कलम २० (१) अन्वये एकत्रित रुपये २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. सचिव, जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये शिफारस करण्यात येतआहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या

झेरॉक्स प्रती देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास कसूर केल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी या सर्वांना एकत्रित रुपये २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, म. रा. पुणे, येरवडा-६, पुणे

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपीलकर्ता
रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, जाफ्राबाद, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग (१), जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग (१), जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | १७-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०५-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग (१), जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत देण्यात यावी. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये सन २००५ ते २००९ पर्यंतच्या कालावधीतील तालुक्यातील सर्व शेतक-यांच्या वीज मागणीचे अर्ज, सर्व शेतक-यांची नांवे, पत्ते, गावे, अनुक्रमांक, दिनांक, विशेष संवर्गातील प्रकार, जातनिहाय प्रवर्ग व प्रतिक्षा यादी इत्यादीच्या सत्यप्रती अशा प्रकारच्या विस्तृत स्वरुपाच्या माहितीची मागणी केली आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग (१), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नंदकिशोर श्रीकिशन तोष्णीवाल,<br>कसबा गांधी चौक, जुना जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकिशोर श्रीकिशन तोष्णीवाल | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना<br>- प्रतिनिधी - श्री. ए. जी. कौरवाळ, उप अभियंता | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी. आर. राणे, सहायक अधीक्षक अभियंता | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | प्रत जोडलेली नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन तसेच आयोगापुढे झालेल्या युक्तिवादावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती मिळालेली नाही. अपिलार्थीने आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कामासंदर्भात खालील माहितीच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अंबड उपविभाग | मोजमाप पुस्तिका क्र. | ५३७ | मोठी |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | २०५ | मोठी |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | २३८ | मोठी |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | १५३ | मोठी |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | २७६ | मोठी |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | १५३ | लहान |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | ४० | लहान |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | ४२ | लहान |
| २ | परतूर उपविभाग | मोजमाप पुस्तिका क्र. | ४६९ | मोठी |
| | | मोजमाप पुस्तिका क्र. | ४११ | मोठी |
| ३ | जालना उपविभाग | मोजमाप पुस्तिका क्र. (कालावधी १९९९-२०००, २०००-२००१ व २००४-२००५) एप्रिल ते मार्च | ७० | लहान |

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये मूळ अर्जाची प्रत आढळून येत नाही. तथापि आज रोजी त्यांनी आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन त्यांना ही माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत, देण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे माहिती विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थी ही माहिती व्यक्तिशः घेण्यास तयार आहेत. ही माहिती पहाण्यासाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल. याकरता एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने त्याबाबत कळवावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस अंबड, परतूर व जालना तालुक्यातील त्यांच्या कामासंदर्भातील संबंधित मोजमाप पुस्तिका पहाण्यासाठी कार्यालयात उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील काही प्रतीची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती विनामूल्य द्याव्यात. ही प्रक्रीया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकिशोर श्रीकिशन तोष्णीवाल, कसबा गांधी चौक, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वास रंगनाथ गोरे, : अपीलकर्ता
व्दारा- श्री. मनोज लोणकर, जिल्हा परिषद मागे, समर्थनगर, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५१

२ सुनावणीची तारीख दि. ०९-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. विश्वास रंगनाथ गोरे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना : उपस्थित
- प्रतिनिधी - श्री. ए. जी. कौरवाळ, उप अभियंता

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी. आर. राणे, सहायक अधीक्षक अभियंता

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०३-०२-२००९
प्रत जोडलेली नाही

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | पत्रावरील दिनांक स्पष्ट नाही |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३१-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रावरुन व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीचे प्रपत्र अ ची प्रत दिसून येत नाही.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या अधिपत्याखालील सर्व कामांच्या तपासणी केलेल्या मोजमाप पुस्तिकांच्या सन २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीतील झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता यांच्या सन २००६-२००७ व २००७-२००८ या वर्षाच्या Tour Diary च्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीने व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०२-२०११**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वास रंगनाथ गोरे, व्दारा- श्री. मनोज लोणकर, जिल्हा परिषद मागे, समर्थनगर, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय जवाहरलाल गुप्ता,<br>मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन,<br>जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना<br>- प्रतिनिधी - श्री. पी. बी. सिंगतवार, वरिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. ए. जी. कौरवार, उप अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-०३-२००९ प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन जानेवारी २००७ ते डिसेंबर २००८ या कालावधीची विविध पाझर तलावांची कुशल, अकुशल, या कामावर हजर असलेल्या मजुरांचे कामनिहाय हजेरीपत्रक, मजुरांना कुठल्या ग्रामपंचायत कार्यालयात मजुरी वाटप करण्यात आली याबद्दल तलाठी ग्रामसेवक सरपंच यांचे प्रमाणपत्र, मोजमाप पुस्तिकेच्या सत्यप्रती इत्यादी व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे आणि ते अपिलार्थीस ती दाखवू शकतात. अपिलार्थीने व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता, मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवदास दामोधर शहाणे, : अपीलकर्ता
मु. पो. नूतन वसाहत, ठाकूरनगर, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २,
जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २८-०४-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०६-२००९ फेरसादर दिनांक २९-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००७-२००९ या दोन वर्षाच्या काळात झालेल्या संपूर्ण कामांचे एम. बी. रेकॉर्ड, सि. आर. एस. आर. व कामाच्या झेरॉक्स प्रती अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीस माहिती दिलेली आढळून येत नाही. अपिलार्थीने व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्‍चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्‍चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु. पो. नूतन वसाहत, ठाकूरनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. देवलाल सांडू आकोदे,<br>रा. हसनाबाद, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ प्रथम दाखल केल्यानुसार |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०६-२००९ फेरसादर दिनांक |

१७-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करताना दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये योग्य ती कागदपत्रे दाखल केल्याचे आढळून येत नाही. वेगवेगळे अर्ज दाखल केले असल्याचे आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. अपिलार्थीने आयोगापुढे योग्य ती कागदपत्रे दाखल केली नसल्यामुळे आयोगास या अपील अर्जावर निर्णय घेणे शक्य होत नाही त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवलाल सांडू आकोदे, रा. हसनाबाद, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी,कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन संतुकराव देशमुख,<br>रा. पिंपळगाव (रेणु.) तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन संतुकराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. कोलते | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०५-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या दिनांक १५-०४-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाखा अभियंता श्री. डी. एस. कोल्हे यांच्या मूळ संचिकेमधून पाच मुद्दयांवर छायांकीत प्रती मागितल्या आहेत. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. परंतु अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगाव (रेणु.) तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोनवणे भाऊसाहेब भिकाजी,<br>मु. पो. चिकनगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना<br>- श्री. बी. जे. पांचाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. ए. जी. कौरवार, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०३-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीतील घनसावंगी तालुक्यामधील रोहयो अंतर्गत झालेल्या कामांवरील मजुरांच्या संपूर्ण नावासह हजेरीपट क्रमांक, कामावरील एकूण मजुरांची संख्या, एकूण पगार व रोहयो व्यतिरिक्त झालेल्या कामांचे गावनिहाय अंदाजपत्रक अशी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनवणे भाऊसाहेब भिकाजी, मु. पो. चिकनगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विनोदकुमार गोविंदराव जोशी, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०६.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामध्ये दि. ०६.१०.२००८ रोजीच्या लोकशाही दिनामध्ये दाखल झालेल्या टोकन नंबर ४७ च्या जन माहिती अधिकारी यांनी दाखल करुन घेतलेल्या अर्जाच्या सोबतच्या सर्व सत्यप्रती मागितल्या आहेत. जिल्हाधिकारी,परभणी यांच्या कार्यालयामार्फत दि. २४.०४.२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे, की संबंधित टोकन क्रमांक ४७ च्या अर्जासोबत एकही कागदपत्र जोडण्यात आल्याचे दिसून येत नाही व फक्त तक्रार अर्ज कार्यालयास सादर केलेला आहे, त्यामुळे त्याच्या सत्यप्रती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी दि. ०५.०६.२००९ रोजी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य), परभणी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती सात दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशित केले असल्याचे दिसून येत आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते, असे आढळून आले नाही. जिल्हाधिकारी,परभणी कार्यालयाकडून अपिलार्थीस दि. ०६.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम अपिलाच्या संदर्भानुसार पुनश्च् कळविण्यात आले आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०६.१०.२००८ रोजी दिलेल्या अर्जात जरी सोबत प्रत जोडण्यात आली आहे असे नमूद केले असले तरी प्रत्यक्षात एकही कागद जोडलेला दिसून येत नाही. त्यामुळे अर्जाची प्रतच उपलब्ध आहे, त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपील बंद करण्यायोग्य असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोदकुमार गोविंदराव जोशी,द्वारा करंजीकर निवास,भगवान वाघमारेच्या बाजुस, गणपती चौक, जिंतूर रोड,परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दामोधर शंकरराव घुगे, : अपीलकर्ता
रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर),उपविभाग,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर),उपविभाग,परभणी - श्री. आर.एफ.शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना - प्रतिनिधी - श्री. ए.जी.कौरवार, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०५.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी - एकूण ४५ पाझर तलावाबद्दलची दि. ०१.०३.२००८ ते ३१.०३.२००८ या कालावधीची सर्व कामांची मंजूर अंदाजपत्रकीय तरतुद, कामावर झालेला खर्च, काम चालू झाल्याचा दिनांक, काम पूर्ण झाल्याचा दिनांक, काम पूर्णत्त्वाचा दाखला, उपयोगिता प्रमाणपत्र, साप्ताहिक मजूर उपस्थिती अहवाल, मजूरांची संख्या,काम किती प्रमाणात केले व कामाचा कालावधी, जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केलेली पतमर्यादा व मजूरांची हजेरीपत्रके, मजूरांचे पगार कोणत्या ग्रामपंचायत कार्यालयात वाटप करण्यात आले त्याबाबत सरपंच,ग्रामसेवक,तलाठी,पोलीस पाटील यांच्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती - अशी विस्तृत स्वरुपाची माहिती व्यक्तिशः मागितली आहे. एवढया मोठया प्रमाणात माहिती देण्याकरिता त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ अपूरे आहे, त्यामुळे माहिती देता येणे शक्य नाही, असे अपिलार्थीस दि. १८.०९.२००९ रोजी कळविले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या माहितीच्या अभिलेखांची पहाणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग,परभणी यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन द्यावा लागेल व या अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग,परभणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु.पो.पांगरी, ता.जिंतुर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख जावेद अ.सत्तार,<br>रा.मानवत,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, मानवत,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,सेलू, जि.परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - शेख जावेद अ.सत्तार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, मानवत,जि.परभणी - डॉ. अरविंद नरसीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी - डॉ. प्रताप काळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना दि. ०७.०५.२००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे. तथापि ती माहिती अपुरी आहे, असे आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे सांगितले. त्यावर आयोगाने सूचित केल्याप्रमाणे नेमकी कोणती माहिती अपुरी आहे, याबाबत विचारणा केली असता, खालीलप्रमाणे माहिती अपुरी असल्याचे सांगितले.

१) मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील - स्व.धा.दुकानदाराला अंत्योदय, ए.पी.एल. योजनेअंतर्गत वाटप केलेले गहू,तांदूळ,साखर, तेल इ.चे प्रमाण क्विंटलमध्ये आकडेवारीची माहिती.

२) मुद्दा क्र.५ च्या संदर्भात स्व.धा.दुकानदाराला अंत्योदय, ए.पी.एल. योजनेअंतर्गत ऑक्टोबर,२००८ ते मार्च, २००९ या कालावधीत वाटप केलेले गहू,तांदूळ,साखर, तेल इ.चे प्रमाण क्विंटलमध्ये आकडेवारी, दुकानदारांनी शिधापत्रिकाधारकांना वाटप केलेल्या या साहित्याच्या नोंदीची सत्यप्रत व या कालावधीतील शिधापत्रिकाधारकांची माहिती.

या मुद्यांसंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे तीन मुद्यांवरील माहिती संकलीत करुन हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ.सत्तार, तकिय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय रोड, दैनिक विश्वमित्र तालुका कार्यालय, मानवत, ता.मानवत, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मानवत,जि.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी,
मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०५.२००९ |
१. श्री. मनोहर चिमाजी चाळक, संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मैनुद्दीन गुलाब, : अपीलकर्ता
मु. पो. देवळा (बु.), तालुका वडवणी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी, इमारत व दळणवळण, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी, इमारत व दळणवळण, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिका-यास अपिलार्थी यांना सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती द्यावी असे आदेशित केले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिका-याने कार्यवाही केली नसल्यास या माहितीच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे यापूर्वी ही माहिती पुरविली नसल्यास ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मैनुद्दीन गुलाब, मु. पो. देवळा (बु.), तालुका वडवणी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, इमारत व दळणवळण, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविभूषण भानुदास जाधवर, : अपीलकर्ता
भाग्यनगर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या पाठीमागे,
घुमरे यांचा वाडा, बीड, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने वर्षनिहाय अशी विस्तृत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांनी त्यांच्या दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे की, आपण स्वत: दिनांक २९-०६-२००९ रोजी समितीच्या कार्यालयात ठिक ११-०० वाजता उपस्थित राहावे. आपणास दिनांक ०३-१०-२००६ ते २८-०५-२००९ पर्यंत या कालावधीत समितीने निकाली काढलेल्या सर्व प्रकरणांचे अभिलेख उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यावरुन आपण उमेदवाराची नावे, वर्ष व तारीख स्वत: लिहून घ्यावीत. याप्रमाणे अपिलार्थीने कागदपत्रांची पाहणी केली आहे किंवा कसे हे आज रोजी आयोगास अवगत होऊ शकले नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय दिलेला नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०२-२०११**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविभूषण भानुदास जाधवर, पो. कॉ. ब. क्र. १२२५, रा. भाग्यनगर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या पाठीमागे, घुमरे यांचा वाडा, बीड, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिर्झा फैजल्ला बेग अहमद बेग, : अपीलकर्ता
रा. हनुमान चौक, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उप अधीक्षक कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पोलीस अधीक्षक,
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७५
२ सुनावणीची तारीख दि. १०-०२-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. मिर्झा फैजल्ला बेग अहमद बेग : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उप विभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड
- प्रतिनिधी - श्री. ए. एन. नवले, पी. एस. आय.
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड
- प्रतिनिधी - श्री. ए. एन. नवले, पी. एस. आय.

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १७-०४-२००९
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १५-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०९-२००९ फेरसादर दिनांक ०६-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांना दिनांक १५-०५-२००९ व दिनांक २५-०६-२००९ रोजी अशी दोनदा माहिती मिळाली आहे. तथापि मिळालेली ही माहिती खोटी, अपुरी व दिशाभूल करणारी आहे असे त्यांचे मत आहे. यावर आयोगाने अपिलार्थीस विचारले की, ही माहिती खोटी, अपुरी व दिशाभूल करणारी कशी आहे ते सांगावे. तेव्हा अपिलार्थी याबाबत नेमका युक्तिवाद करु शकले नाहीत तथापि त्यांना जी माहिती दिलेली आहे त्याची शहानिशा व्हावी असे त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडले. या करिता अपिलार्थीने मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती बरोबर आहे किंवा कसे ही बाब पोलीस अधीक्षक, बीड यांनी व्यक्तिशः पहावी व तसे अपिलार्थीस कळवावे असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

पोलीस अधीक्षक, बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेली माहिती यांची पाहणी वर नमूद केल्याप्रमाणे करुन हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिर्झा फैजल्ला बेग अहमद बेग, रा. हनुमान चौक, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वसंतराव मारुती जोगदंड,<br>रा.बर्दापूर, ता.अंबाजोगाई,जि.बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १९.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौ.बर्दापूर येथील गट नं. २४३ मधील गायरान जमिनीबाबत माहिती मागितली आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा

नायब तहसीलदार (म), अंबाजोगाई यांनी दि. १९.०५.२००९ रोजी सहायक जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा बर्दापूर,ता.अंबाजोगाई यांच्याकडे अपिलार्थीचा संदर्भित माहितीसाठीचा अर्ज वर्ग केला व अपिलार्थी यांना त्या पत्राची प्रत दिली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे संबंधित तलाठी यांचेशी संपर्क साधावा असे कळविले आहे. अपिलार्थीस दि. १५.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये सहायक जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा बर्दापूर,ता.अंबाजोगाई,जि.बीड यांनी माहिती पुरविली आहे. या पत्राच्या प्रतीवर अपिलार्थीने त्यांना माहिती मान्य नाही, अशी नोंद २१.०४.२००९ या दिनांकासह केलेली असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन, दोनही बाजूंचे म्हणणे नोंदवून आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंतराव मारुती जोगदंड, मु.पो.बर्दापूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संदीपान आप्पाराव थोरात, : अपीलकर्ता
रा.धारुर, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय धारुर,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १९.०३.२००९ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, धारुर, जि.बीड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१) व शासन सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१८.०६.२००५ परिपत्रकान्वये १७ कामांचा तपशील प्रसिध्द करणे बंधनकरक आहे, त्याबाबतची कामांची परिपूर्ण माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस दिलेली आहे, असे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,धारुर, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे अथवा त्यावर निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धारुर, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यथोचित निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धारुर,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यथोचित निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदीपान आप्पाराव थोरात, द्वारा मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, जि.बीड-४३१ १२४

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय धारुर,जि.बीड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,धर्माबाद, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम
विभाग,भोकर,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०५.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही.

आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण १९३ मोजमापपुस्तिकेच्या संदर्भातील विस्तृत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन त्यासंदर्भात दि. ११.०५.२००९ रोजी निर्णय पारित केला आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी वीस दिवसांचे आत द्यावी. याबाबतची सद्यस्थिती आयोगास अवगत झाली नाही. याबाबत अपिलार्थीस माहिती दिली गेली नसल्यास अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांची पहाणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन द्यावा लागेल व या अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील,घर क्र.९-६-२२०,उमर कॉलनी, मस्जीद समोर, देगलूर रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कामाजी तुकाराम बनसोडे,<br>रा.तरोडा बु. ता.जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पु.),<br>तहसील कार्यालय,लोहा, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,लोहा, जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड-प्रतिनिधी- श्री. बी. एन.पुलकुंडवार,अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, लोहा, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री.दिगांबर व्यंकन्ना दमकोंडवार,श्री.बालाजी गंगाधर कटकमवार,श्री.बालाजी नरहरी वट्टमवार | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जाची तारीख | | दि. ३०.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये लोहा तालुक्यातील तीन रॉकेल विक्रेत्यासंदर्भात रॉकेल नियतनाबाबत मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू समजू शकली नाही. तथापि अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ३१.०१.२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. यामध्ये अपिलार्थी यांनी नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. ३१.०१.२०११ रोजी मिळाली आहे व त्यामुळे त्यांचा द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात यावा.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे (पत्रकार), द्वारा सौ.सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.),नांदेड - ५

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोतीराम गयबू काळे, : अपीलकर्ता
रा.जानापूरी, ता.लोहा, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड- श्री. एस.ए.झाडके | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी- प्रतिनिधी- श्री. राजेंद्र गळगे,नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती दि. ०५.०३.२००९ रोजी देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दि. २०.०४.२००९ रोजी सुनावणी झाली. यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढले आहे व ही बाब अपिलार्थीस दि. २८.०४.२००९ रोजी कळविण्यात आली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुनही अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे, ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु.जानापूरी,पो.वडेपूरी, ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. स.नुरअली स.बाखर अली,<br>रा.अर्धापूर, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड- श्री. एस.ए.झाडके | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, नांदेड-प्रतिनिधी- श्री. राजेंद्र गळगे,नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती तहसीलदार, अर्धापूर कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज तहसीलदार,अर्धापूर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३) अन्वये वर्ग केला व त्याची सूचना अपिलार्थी यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २०.०४.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलामधील मुद्यांवर विचार केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व ही बाब उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपिलावर असा निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने तहसील कार्यालय,अर्धापूर यांच्याकडून माहिती हस्तगत करावी. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व मोठया प्रमाणात असलेली व्याप्ती याचा विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),अर्धापूर यांना अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांची पहाणी करण्याकरिता त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन द्यावा लागेल व या अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,अर्धापूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स.नुरअली स.बाखरअली, रा.कुबा कॉलनी, अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,अर्धापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, : अपीलकर्ता
रा.नरसी,ता.नायगाव,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
नायगाव खै.जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, नायगाव खै.
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०७.२००९ (फेरसादर दि. १६.०६.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकत नाही.

सबब सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, तालुका उपाध्यक्ष (राष्ट्रवादी युवक) मु.पो.नरसी, ता.नायगाव (खै.), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एस.एन.झाकडे, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी,
पाझर तलाव लघुसिंचन कामे,क्र.२, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),नांदेड - श्रीमती दिपाली मोतियेळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, नांदेड - प्रतिनिधी श्री. राजेंद्र गळगे, नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस दि. ०५.०५.२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे. यावर समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी पुनश्च् पृच्छा केल्यामुळे अपिलार्थीस दि. ०२.०६.२००९ रोजी अतिरिक्त माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दि. २९.०६.२००९ रोजी सुनावणी घेतली व यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून तसेच उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याच्या कारणाने अपिलीय अधिकाऱ्याने अपील फेटाळण्याचा निर्णय दिला आहे.आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. एस.एन.झाकडे, दिलीपसिंग कॉलनी, घर नं. २-११-४१२, गोवर्धन घाट रोड, नांदेड, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),पा.त.ल.सि.का.-२, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. स.वजिर स.अहमद,<br>रा.अर्धापूर,जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्याचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, कब्रस्थानाच्या जागेवरील

अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी,नांदेड यांनी चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा जो अहवाल वरिष्ठांना पाठविला आहे, त्या चौकशी अहवालाच्या सत्यप्रतीची मागणी केलेली आहे. ही माहिती सन २००७-०८ या कालावधीची आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन, जन माहिती अधिकारी यांनी हा अहवाल अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी दि. ०९.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी दि. २०.०६.२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि ०२.०७.२००९ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये तहसीलदार यांच्याकडून त्वरित अहवाल मागवून घ्यावा व अहवाल प्राप्त होताच त्याप्रमाणे अपिलार्थीस देण्यात यावा, असे नमूद केले आहे. आज सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी दोघेही अनुपस्थित असल्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकली नाही. अपिलार्थीस सदर अहवालाची प्रत देय होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना सदर माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात वर नमूद केलेली अहवालाची प्रत अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्य्द वजीर सय्यद अहेमद, बरकतपूरा, अर्धापूर, ता.अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहमंद अन्वरउल्ला खान, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष कार्य अधिकारी,
गुरु-ता-गद्दी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय,
नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष कार्य अधिकारी,गुरु-ता-गद्दी,जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड- श्री. जयंत दांडेगावकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, नांदेड - प्रतिनिधी श्री. राजेंद्र गळगे, नायब तहसीलदार(निवडणूक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण दहा मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यामधील आठ मुद्यांशी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित होती व उर्वरित मुद्दा क्र. ६ व ९ या दोन मुद्यांवरील माहिती कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प क्र.५ या कार्यालयाशी संबंधित होती. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २६.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटी शुल्क ` १५८८/- इतके जमा करण्याकरिता कळविले आहे. तदनंतर पुन्हा दि. २९.१२.२००८ रोजी एकूण पृष्ठांचा तपशील कळविण्यात येऊन माहितीपोटीच्या शुल्काची निश्चित रक्कम ` १६२०/- इतके भरणा करण्याकरिता कळविलेले आहे. त्यानंतर अपिलार्थीस एकूण आठ मुद्यांवरील माहिती दि. १६.०२.२००९ रोजी पुरविण्यात आली आहे. यामध्ये एकूण ८१० पृष्ठांचा समावेश आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३०.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन दि. ०१.०४.२००९ रोजी निर्णय निर्गमित केला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ यांच्याकडे आवश्यक वाटल्यास प्रथम अपील अर्ज सादर करावा. जन माहिती अधिकारी यांच्या माहितीनुसार संबंधित कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प क्र.५ कार्यालयाकडून अपिलार्थीस दोन मुद्यांवर मुद्दा क्र. ६ व ९ शी संबंधित माहिती देण्यात आली आहे. सदरच्या दोन मुद्याबाबतची माहिती जर संबंधित कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्यास, पुन्हा द्यावी लागेल व ही माहिती त्यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी, कार्यालय कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प क्र.५ नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ व ९ या दोन मुद्यांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम.ए.खान, ९-४-४५५.कय्युम प्लॉटस्,रा. नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी,गुरु-ता-गद्दी,जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी, कार्यालय कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प क्र.५ नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वैभव अभिमान पवार,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन, भिमसंदेश मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पडेगाव, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक (सहकार), औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वैभव अभिमान पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर असे सांगितले की त्यांनी त्यांचे दि. ०३.०७.२००९ रोजीच्या अर्जान्वये एकूण तीस मुद्यांवर माहिती मागितली होती, या माहितीकरिता

शुल्क ` १०००/-चा भरणा करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. ३०.०७.२००९ रोजी कळविले आहे. तथापि त्याचा तपशील दिलेला नाही, त्यामुळे त्यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १९.०९.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये ` २/-प्रतिपृष्ठ याप्रमाणे शुल्क घेऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दहा दिवसांचे आत द्यावी, असे जन माहिती अधिकाऱ्यास आदेशित केलेले आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत तसेच इतर सहकारी संस्थेबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या एकूण तीस मुद्यांच्या माहितीमधील जी माहिती अपिलार्थीस देय होत आहे, ती एक विशेष बाब म्हणून संबंधित गृहनिर्माण संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही योजावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या एकूण तीस मुद्यांच्या माहितीमधील जी माहिती अपिलार्थीस देय होत आहे, ती एक विशेष बाब म्हणून संबंधित गृहनिर्माण संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वैभव अभिमान पवार,१५/८८, आनंदनगर शासकीय वसाहत (कोटला कॉलनी), अदालत रोड, औरंगाबाद

२. चेअरमन, भिमसंदेश मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पडेगाव, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. एन. बी. शाह,औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,<br>पुरवठा विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, औरंगाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एन.बी.शाह | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद - श्री. एम.एल.पवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद -प्रतिनिधी - श्री. कल्याण बोडखे,जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. पत्रावर दिनांक नाही |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०६.२००९ (फेरसादर दि. ११.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस दि. ११.०५.२००९ रोजी पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्यावेळी मान्य केली. तथापि त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये काही त्रूटी असल्याचे यावेळी सांगितले. त्या त्रूटी खालीलप्रमाणे आहेत.

१) मुद्दा क्र. ३ : शिधापत्रिका/स्लिप वितरीत करताना विहीत नमुन्यातील अर्ज भरुन न घेता चलन भरुन घेण्यासंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रकांची छायाप्रत.

२) मुद्दा क्र. ५ : या मुद्यासंदर्भातील माहिती अप्राप्त आहे. त्यामुळे यासंदर्भात जानेवारी, २००९ पासून शिधापत्रिकेसाठीचे विहित नमुन्यातील कोरे अर्ज कार्यालयातील कोणत्या कर्मचाऱ्याकडे आहेत, त्याचे नाव व पदनाम - अशी माहिती.

३) मुद्दा क्र. ६ : माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ४ अन्वये प्रसिध्द करावयाच्या माहितीसंदर्भात अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबद्दलची कागदपत्रे किंवा संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात असल्यास त्याचा संदर्भ देण्यात यावा.

त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये पुढे आयोगास असे सांगितले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती सुमारे तीन महिने उशिरा प्राप्त झाली आहे. या बाबीची नोंद आयोग घेत आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार भविष्यकाळात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही होईल, याची दक्षता घेणे जरुरी आहे, यासाठी त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

३) जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ६ च्या संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

४) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एन. बी. शाह, साने हॉस्पीटलजवळ, जुबली पार्क, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पप्पु सिताराम जाधव, : अपीलकर्ता
रा.वानेगाव, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री,जि.औरंगाबाद - श्री. राजेश विष्णू इंगळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. अ.मुकीम देशमुख | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.फुलंब्री यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०६.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती संबंधित ग्रामसेवक,वाणेगाव,ता.फुलंब्री यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.औरंगाबाद यांनी दि. २७.१०.२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या अगोदर दि. ०४.०९.२००८ रोजी ग्रामसेवक यांनी माहिती दिलेली असून अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याची पोच लेखी स्वरुपात दिलेली आहे याकरिता अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे. आयोगापुढे आज रोजी अपिलार्थी यांची दि. ०४.०९.२००८ रोजीची ही टिपणी सादर करण्यात आली. त्यामध्ये अपिलार्थी यांनी नमूद केले आहे की, "सुनावणी दि. २७.०८.२००८ रोजी पंचायत समिती, फुलंब्री येथे होऊन मला ग्रामसेवक यांनी १२ वा वित्त आयोगाबाबत झालेल्या कामाबाबत माहिती व एम.बी.ची संपूर्ण झेरॉक्स प्रत दिली आहे. माहितीबाबत काही तक्रार नाही." अपिलार्थी आज सुनावणीस अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

या सर्व बाबी विचारात घेऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पप्पु सिताराम जाधव,रा. वानेगाव, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते,रा.औरंगाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना- श्री. एस.एम.बोरोळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी. आर. राणे, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०९.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आज उपलब्ध आहे. ती अपिलार्थी व्यक्तिशः घेऊन जाणार होते. परंतु ते कार्यालयात उपस्थित झाले नाहीत, त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. आज सुनावणीच्यावेळी आयोगासमोर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी माहिती हस्तांतरित करु शकतात. त्याप्रमाणे आयोगाच्या सूचनेनुसार ती माहिती त्यांनी अपिलार्थीस हस्तांतरित केली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. ही माहिती अपिलार्थी यांनी पहावी व त्यांच्या संदर्भित मूळ अर्जानुसार या माहितीमध्ये काही त्रूटी आढळल्यास जन माहिती अधिकारी यांना कळवावे व त्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीस त्वरित द्यावी लागेल.ही कार्यवाही तीस दिवसांच्या कालावधीमध्ये पूर्ण करावी लागेल.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे.याकरिता संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना अधिनियमातील कलम २०(१) अन्वये शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा द्यावा लागेल. तसेच अधिनियमातील कलम २०(२) अन्वये अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात त्यांनी विलंबाने माहिती दिल्यामुळे संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहकारी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) यांना करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१३)अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ` २५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, ल.पा.(स्था.स्तर) मंडळ,पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता/उपअभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबादयांची राहील.

१४) सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)विभाग,जालना व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक

अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. ठाकूर निवास बढाई गल्ली, औरंगपूरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता,ल.पा.(स्था.स्तर) मंडळ,म.रा.पुणे,येरवडा-६,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (जलसंपदा),महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती मुमताज बेगम अब्दुल खमर शेख, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद- श्री. जी. एस. सुसर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. जी. एस. सुसर, उपशिक्षणाधिकारी (मा) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०७.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२००९ (फेरसादर दि.१३.१०.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती दोन शाळेच्या संदर्भात असून ती त्यांना आतापर्यंत देता येऊ शकली नाही. दरम्यानच्या काळात अपिलार्थीस रजिया फातेमा उर्दू हायस्कुल, कटकटगेट, औरंगाबाद या शाळेसंदर्भातील माहिती हवी आहे, असा त्यांनी जन माहिती अधिकारी यांना खुलासा केलेला आहे.जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, दोनही शाळेकडे त्यांचा मूळ अर्ज दि. १३.०७.२००८ रोजी वर्ग केला आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत रजिया फातेमा उर्दू हायस्कुल, कटकटगेट, औरंगाबाद या शाळेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.तथापि संबंधित मुख्याध्यापक यांनी त्यांच्याकडे कागदपत्रे उपलब्ध नसून संस्थेकडे उपलब्ध असल्याचे सांगितले व संस्थेकडून माहिती देण्यास प्रतिसाद मिळत नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, शिक्षणाधिकारी यांनी संबंधित शाळेची दोन वेळा तपासणी केली असून त्या शाळेची मान्यता काढून घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, शाळेची मान्यता काढून घेण्याकरिता प्रक्रिया सुरु होईल, त्यावेळी शिक्षणाधिकाऱ्याकडे ही माहिती उपलब्ध होऊ शकेल. सबब त्यांना ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा.), जि.प.औरंगाबाद यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली रजिया फातेमा उर्दू हायस्कुल, कटकटगेट, औरंगाबाद शाळेसंबंधीची माहिती त्यांच्याकडे ज्यावेळी उपलब्ध होईल त्यावेळी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती मुमताज बेगम अब्दुल खमर शेख,अरमान कटपिस सेंटर, यासीन मस्जीद, कटकटगेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के, : अपीलकर्ता
रा. भराडी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के - प्रतिनिधी - श्री. उज्ज्वल प्रकाश सोनटक्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. महादेव आश्रुबा डिरवले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-१२-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०४-२००९ फेरसादर दिनांक २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मागितलेल्या माहितीपोटीच्या रुपये ५० इतक्या शुल्काचा भरणा दिनांक १७-१२-२००८ रोजी तहसील कार्यालय, सिल्लोड यांनी कळविल्यानुसार केलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २४-०२-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांना निदेशित केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना आजपर्यंत माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, यांच्याकडे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा एक संच उपलब्ध आहे व तो ते अपिलार्थीस देऊ शकतात. आयोगाच्या आदेशावरुन माहितीचा एक संच अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देण्यात आला व तो त्यांनी स्वीकृत केला आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के, रा. भराडी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, : अपीलकर्ता
५-१-५५/१, उस्मानपुरा, तारा पानसेंटर जवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सरदार हरजीतसिंग सहानी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. अविनाश देशमुख | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,<br>औरंगाबाद - श्री. दीपक पुरुषोत्तम कुलकर्णी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण सहा मुद्दयांवरील माहिती मागितली आहे. ती अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००९ रोजी खास दुतामार्फत पाठविण्यात आलेली आहे व ती दिनांक २३-०९-२००९ रोजी कोणीतरी स्विकृत केल्याची त्यांच्याकडे नोंद आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना ही माहिती मिळाली नाही व जन माहिती अधिकारी सांगतात त्याप्रमाणे माहिती मिळाल्याबाबतची सहीही त्यांची नाही. अपिलार्थी हे ही माहिती व्यक्तिशः घेण्यास तयार आहेत. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना दूरध्वनीने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन ही माहिती व्यक्तिशः द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीचा एक संपूर्ण संच अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपुरा, तारा पानसेंटर जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रशांत कौतिकराव चौधरी,<br>व्दारा, स्नेहल इलेक्ट्रीकल्स, नूतन कॉलनी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. क्षीरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. जे. पी. विसपूते, सहायक माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. शिवाजी गणपतराव भाग्यवंत, तलाठी | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. प्रशांत कृष्णराव पानसरे, तलाठी | : | उपस्थित |
| ३.६ | श्री. विजय ग.जोशी, श्रीमती सत्यभामा नरवडे,श्री.देवराव भि.केदारे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. शिवाजी गणपतराव भाग्यवंत, तलाठी व श्री. प्रशांत कृष्णराव पानसरे, तलाठी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १४-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या सात मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ते ६ मधील जी माहिती उपलब्ध होती ती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, गेवराई यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००९ रोजी दिली आहे. मुद्दा क्रमांक ७ ची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित आहे. मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहिती तलाठी यांच्याशी संबंधित नसून ही माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित आहे ही बाब अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना कळवावी लागेल. मुद्दा क्रमांक १ ते ६ मधील उर्वरित माहिती आज रोजी जी उपलब्ध आहे, जसे अर्जाची प्रत व तक्रार अर्जाशी संबंधित माहिती इ. अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित तलाठ्याकडून उर्वरित माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रशांत कौतिकराव चौधरी, व्दारा, स्नेहल इलेक्ट्रीकल्स, नूतन कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जब्बार शेख सत्तार, : अपीलकर्ता
पत्रकार भवन, प्लॉट नं. ११, ताज रेसिडेन्सी समोर,
महेमुदपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद - श्री. क्षीरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. जे. पी. विसपुते, सहायक माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. मल्हारी व श्रीपत भिल्ल | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये १९६१ सालाची माहिती मागितली आहे व ती त्रयस्थ पक्षाच्या जमिनीशी संबंधित आहे. ही माहिती सुमारे ५० वर्षापूर्वीची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर संचिका अभिलेख विभागामध्ये शोधण्याचे काम चालू आहे व संचिका उपलब्ध झाल्यास नक्कल देण्यात येईल असे दिनांक ०१-०७-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले. तदनंतर दिनांक ०६-०८-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी सदर संचिका अभिलेख विभागामध्ये शोधली असता आढळून आली नाही असे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी सदर संचिका अभिलेख विभागामध्ये शोधण्याचा प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी अभिलेख विभागामध्ये माहिती शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे व माहिती उपलब्ध झालेली नाही ही बाब विचारात घेता प्रकरण निकाली काढावे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जब्बार शेख सत्तार, पत्रकार भवन, प्लॉट नं. ११, ताज रेसिडेन्सी समोर, महेमुदपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. नितनवरे पुष्पानंद शंकरराव,<br>जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड प्रितमकुमार शेगांवकर यांच्या बंगल्याशेजारी, लोहिया हॉस्पिटल समोर, क्रांतीनगर, औरंगाबाद | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : उपस्थित |
| १ | मुख्याध्यापक, ज्योती विद्यामंदिर, प्रा. वि. बोहरी कठडा, औरंगाबाद | -- " -- |
| २ | मुख्याध्यापक, शुभंकरोति प्राथमिक शाळा, सराफा, औरंगाबाद | -- " -- |
| ३ | मुख्याध्यापक, राहुल प्राथमिक शाळा, समतानगर, औरंगाबाद | -- " -- |
| ४ | मुख्याध्यापक, अमर प्राथमिक शाळा, बायजीपुरा, औरंगाबाद | -- " -- |
| ५ | मुख्याध्यापक, बालविकास विद्यामंदिर, एन-९, हडको, औरंगाबाद | -- " -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | मुख्याध्यापक, संत तुकाराम प्राथमिक विद्यालय, आंबेडकरनगर, औरंगाबाद | -- " -- |
| ७ | मुख्याध्यापक, रविसूत प्राथमिक शाळा, मिलींदनगर, औरंगाबाद | -- " -- |
| ८ | मुख्याध्यापक, अनंत भालेराव विद्यामंदिर, औरंगाबाद | -- " -- |
| ९ | मुख्याध्यापक, स्वयंभू प्राथमिक शाळा, चिकलठाणा, औरंगाबाद | -- " -- |
| १० | मुख्याध्यापक, नंदनवन विद्यामंदिर प्राथमिक शाळा, शांतीपुरा, औरंगाबाद | -- " -- |
| ११ | मुख्याध्यापक, ज्ञान प्रबोधिनी प्राथमिक शाळा, बेगमपुरा, औरंगाबाद | -- " -- |
| १२ | मुख्याध्यापक, धारेश्वर प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद | -- " -- |
| १३ | मुख्याध्यापक, ज्ञानेश्वर प्राथमिक शाळा, बेगमपुरा, औरंगाबाद | -- " -- |
| १४ | मुख्याध्यापक, लोकसेवा प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद | -- " -- |
| १५ | मुख्याध्यापक, राष्ट्रकूट प्राथमिक विद्यालय, जाधववाडी, औरंगाबाद | -- " -- |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. पवार बी. बी. अधीक्षक वर्ग-२ | : -- " -- |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (१५) व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २२-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण २० शाळेसंबंधी पाच मुद्दयांवर माहिती मागितली आहे. या माहितीच्या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, २, ४ व ५ च्या संदर्भात मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ चे अवलोकन करावे त्यामध्ये माहिती मिळेल असे कळविले आहे. त्याची एक प्रत अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांना द्यावी लागेल. तसेच मुद्दा क्रमांक ३ च्या बाबत ही माहिती शाळेशी संबंधित असून संबंधित शाळेचे मुख्याध्याक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि अपिलार्थीचा हा अर्ज मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला नाही व त्यांना प्राप्त झाला नाही असे सर्वांनी सांगितले. त्याची एक प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित मुख्याध्यापक यांना द्यावी लागेल. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती वगळून संबंधित मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती अपिलार्थीस परस्पर पाठवावी लागेल. संबंधित शाळा या खाजगी शाळा असून त्यांना शासकीय अनुदान मिळते त्यामुळे त्यांना ही माहिती देय होत आहे. मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये जी प्रश्नार्थक, खुलासेवजा अशी माहिती मागितली आहे ती मात्र अपिलार्थीस देय होणार नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. सर्व जन माहिती अधिकारी (Deemed)तथा मुख्याध्यापक यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.औरंगाबाद यांनी अपिलार्थीस मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ च्या शासन निर्णयाची प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितनवरे पुष्पानंद शंकरराव, जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड प्रितमकुमार शेगांवकर यांच्या बंगल्याशेजारी, लोहिया हॉस्पिटल समोर, क्रांतीनगर, औरंगाबाद.

२ मुख्याध्यापक, ज्योती विद्यामंदिर, प्रा. वि. बोहरी कठडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ मुख्याध्यापक, शुभंकरोति प्राथमिक शाळा, सराफा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्याध्यापक, राहुल प्राथमिक शाळा, समतानगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्याध्यापक, अमर प्राथमिक शाळा, बायजीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ मुख्याध्यापक, बालविकास विद्यामंदिर, एन-९, हडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ मुख्याध्यापक, संत तुकाराम प्राथमिक विद्यालय, आंबेडकरनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ मुख्याध्यापक, रविसूत प्राथमिक शाळा, मिलींदनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ मुख्याध्यापक, अनंत भालेराव विद्यामंदिर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० मुख्याध्यापक, स्वयंभू प्राथमिक शाळा, चिकलठाणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ मुख्याध्यापक, नंदनवन विद्यामंदिर प्राथमिक शाळा, शांतीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ मुख्याध्यापक, ज्ञान प्रबोधिनी प्राथमिक शाळा, बेगमपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ मुख्याध्यापक, धारेश्वर प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ मुख्याध्यापक, ज्ञानेश्वर प्राथमिक शाळा, बेगमपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५ मुख्याध्यापक, लोकसेवा प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१६ मुख्याध्यापक, राष्ट्रकूट प्राथमिक विद्यालय, जाधववाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१७ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळासाहेब म्हस्के, : अपीलकर्ता
राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - श्रीमती वर्षा ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. किसनराव लवांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०८-००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या कार्यालयातील फुलंब्री व औरंगाबाद तालुक्यातील रस्त्याच्या हजेरीपटाच्या प्रती मागितल्या आहेत व त्यासोबत हजेरीपट क्रमांक व दिनांक यांची यादी जोडली आहे. ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही व ती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखालील संबंधित अभियंत्याकडे उपलब्ध होऊ शकते. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०३-१०-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची पडताळणी करावी व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अभिलेखात उपलब्ध असल्यास ती १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस द्यावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी पडताळणी केली व ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना त्यांच्या दिनांक १३-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कळविले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे हेही ज्ञात होऊ शकले नाही. यास्तव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना अपिलार्थीने मागितलेल्या हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस पुरवाव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के, राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी. बी. सोनवणे, : अपीलकर्ता
हॉल नं. ४-३५-४०२, प्लॉट नं. सी-१९, गल्ली नं. ०६,
गजानन नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अन्नधान्य वितरण अधिकारी (शहर), जिल्हाधिकारी
कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बी. बी. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी (शहर), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री. एम. एल. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री. किसनराव लवांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २५-०९-२००९

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ती अपिलार्थीस देऊ शकतात.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे त्यांना माहितीच्या शुल्कापोटी रुपये २०,००० भरण्याचे कळविले होते.तसेच ही बाब त्यांना उशीराने कळविण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये १०/- याप्रमाणे २००० पृष्ठांसाठी शुल्क रुपये २०,०००/- भरण्याचे कळविले आहे. आयोगास ही बाब बरोबर आढळून येत नाही. याकरिता भविष्यात त्यांना दक्ष राहावे लागेल.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी जी माहिती उपलब्ध आहे व जी माहिती अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या अर्जात उल्लेख केली आहे ती माहिती अपिलार्थीस आयोगासमोर देण्यात आली. अपिलार्थीने ती स्वीकारली.अपिलार्थीस या माहितीमध्ये त्रूटी आढळून आल्यास पंधरा दिवसांच्या आत त्यांना जन माहिती अधिकारी यांना कळवावे व त्यानंतर ती माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत द्यावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. बी. सोनवणे, हॉल नं. ४-३५-४०२, प्लॉट नं. सी-१९, गल्ली नं. ०६, गजानन नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी (शहर), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हारसिंग कोंडीराम गुसींगे,<br>मु. पो. शेवगा, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हारसिंग कोंडीराम गुसींगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद - श्री. क्षीरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय,<br>औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. जे. पी. विसपूते, सहायक<br>माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-१२-२००० च्या आदेशाची प्रत मागितली आहे. ती त्यांना अद्दयापपावेतो मिळालेली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, दिनांक १९-१२-२००० चे गट नं. ९ क्षेत्र ६३ आर फेरफार क्रमांक ८५३ बाबतीत असे आदेश नाहीत व त्याबाबतची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. या बाबीची नोंद आयोगाने घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी विनंती केली. तथापि आयोगाचे मत असे आहे की, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी याबाबत पुन्हा एकदा पडताळणी करावी आणि तशी प्रत त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यास त्यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल आणि प्राप्त न झाल्यास तसे अपिलार्थीस कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या आदेशाच्या प्रतीचा शोध त्यांच्या कार्यालयात पुन्हा घ्यावा आणि प्राप्त झाल्यास त्याची प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी आणि प्राप्त न झाल्यास तसे अपिलार्थीस कळवावे. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हारसिंग कोंडीराम गुसींगे, मु. पो. शेवगा, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. मोहनलाल अर्जूनदास शामनानी,<br>रा. प्लॉट नं. २४० सतगुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय,<br>सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी<br>कार्यालय, औरंगाबाद | : |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. ए. जी. तायडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा जिल्हाधिकारी मुद्रांक,<br>औरंगाबाद - श्री. गोरखनाथ बाळासाहेब कु-हाडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०७-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-१०-२००९ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. १३-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ११-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती प्रथमतः त्यांना दिनांक ०७-०९-२००९ रोजी खुलासेवजा कळविली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा जिल्हाधिकारी मुद्रांक, औरंगाबाद यांनी दिनांक २६-१०-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. त्या निर्णयामध्ये निदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दिनांक २१-१२-२००९ रोजी देण्यात आली आहे व याबाबतची पोच त्यांच्याकडे आहे. अपिलार्थीने मागितलेल्या कालावधीतील २३१ प्रकरणांची एकूण १६ पृष्ठांची माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास दाखविण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे असे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. मोहनलाल अर्जूनदास शामनानी, रा. प्लॉट नं. २४० सतगुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा जिल्हाधिकारी मुद्रांक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रणजित हरीभाऊ मनोरे,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो),<br>जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो),<br>जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - सौ. वर्षा ठाकूर-घुगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे औरंगाबाद जिल्हयातील सर्व नऊ तालुक्यातील म.ग्रा.रो.ह.यो.व कुशल व अकुशल कामाबाबतचा तपशील,खर्च इ. कामाची यादी मागितलेली आहे. ही माहिती संबंधित तालुक्याचे तहसीलदार व गट विकास अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असते. यास्तव अपिलार्थीचा अर्ज प्रथमतः त्यांच्याकडे पाठविण्यात आला. तथापि अपिलार्थी यांनी यासंदर्भातील प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर न करता उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडेच दाखल केले. यामुळे अपिलार्थी यांना कळविले आहे की, यासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर करण्यात यावे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता येऊ शकली नाही. उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली सन २००६-२००९ या कालावधीमधील माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीतील माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. यातील बहुतांश माहिती संकेतस्थळावर तसेच तत्कालीन नियतकालिक विवरणपत्रे जसे एम.पी.आर./एम.आय.एस.मध्ये समाविष्ट असेल. यास्तव ही माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल, त्या स्वरुपात अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे संकलीत केलेली माहिती आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रणजित हरीभाऊ मनोरे,रेल्वेस्टेशन, जहागिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हीसिंग सेंटरच्या बाजुला, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,<br>रा. घारदोन, ता.जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद - श्री. कल्याण बोडखे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. कल्याण बोडखे, जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १५.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये औरंगाबाद जिल्हयातील रॉकेल, गॅस इ.पुरवठा करणाऱ्या कंपन्या व डेपोबाबतची जिल्हानिहाय,तालुकानिहाय,सर्कलनिहाय,एजन्सीनिहाय सन १९९१ ते दि. १५.०५.२००९ या कालावधीची माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे वारसांच्या नावे झालेल्या एजन्सीचे जाहीर प्रगटन प्रसिध्दी दिलेल्या एजन्सीचे व वर्तमानपत्राचे नाव व जाहीर प्रगटनाची छायाप्रत, तसेच एजन्सीच्या कालावधीसंदर्भात शासननिर्णय/परिपत्रके इ. अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. यावर दि. २२.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस कळविले आहे की, "माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित नाही व आपणास हवी असलेली माहिती उल्लेख केल्यास माहिती देण्यास सुलभ होईल." यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत विस्तृत असल्याकारणाने अधिनियमातील कलम ७(९) नुसार या माहितीच्या अभिलेखांची पहाणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन द्यावा लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल व या अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जुन साहेबराव नवपुते, रा. घारदोंन ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लकीर रहेमान खान,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.),जि.प.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बी.बी.पवार, अधीक्षक-वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे स्टेपींग स्टोन या शाळेसंदर्भात माहिती मागितली आहे. परंतु ही शाळा कायमस्वरुपी विनाअनुदान तत्त्वावर चालविण्यात येत आहे. सदर शाळेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान देण्यात येत नाही. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या शाळेस लागू होत नाहीत. तथापि शिक्षणाधिकारी यांच्याकडे या शाळेच्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे, त्यापैकी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली कागदपत्रे दि.१८.०९.२००९ रोजी देण्यात आली आहेत व त्याच दिवशी अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याबाबतची पोच दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी केलेला युक्तिवाद तसेच आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे या बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लकीर रहेमान खान, राहत हॉस्पीटल, हर्सूल पूलाजवळ, जळगाव रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आर. जी. बाकलीवाल,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वॉर्ड अधिकारी, वॉर्ड फ,<br>मनपा, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कर निर्धारक व संकलक,<br>मनपा, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आर. जी. बाकलीवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वॉर्ड अधिकारी, वॉर्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद -श्री. एम.एम.पाटणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. रविंद्र प्रभाकरराव निकम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी,वॉर्ड-फ, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की,अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. १७.०७.२००९, १७.०८.२००९,२४.०८.२००९,१०.०९.२००९,२४.११.२००९ रोजी विविध टप्प्यामध्ये देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली तथापि त्यांचे या माहितीसंदर्भातील आक्षेप आयोगासमोर सांगितले. त्यासंदर्भात त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली सुस्पष्ट माहिती त्यांना आवश्यक आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१) सन १९७८- १९८८ या दहा वर्षांच्या कालावधीची अपिलार्थी यांनी भरलेल्या मालमत्ता कराच्या रकमेची वर्षनिहाय संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती.
२) सन १९७८ ते ८८ या कालावधीची अपिलार्थी यांच्या मालमत्ता कराबाबतच्या मागणी रजिस्टरची झेरॉक्स प्रत.
३) औरंगाबाद महानगरपालिका वॉर्ड फ मधील मालमत्ता कराच्या मागणी रजिस्टरमधील आकडेवारीची माहिती विशिष्ट प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तयार करुन दिलेली आहे. सदर प्रपत्र ज्या कागदपत्रांतील आकडेवारीवरुन/माहितीवरुन तयार केले आहे, त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात.
४) सन १९७८ ते ८८ या दरम्यान ज्या आधारे मालमत्ता कर आकारण्यात आलेला आहे, त्याबाबतचे शासन आदेश/परिपत्रके किंवा ठराव यांच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात.

जन माहिती अधिकारी यांना वरील माहितीच्या साक्षांकित छायांकित प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण साक्षांकित छायांकित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर. जी. बाकलीवाल, प्लॉट नं. ३, पन्नालालनगर, नालंदा हायस्कूलजवळ, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तमराव किशनराव जाधव, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय लेखाधिकारी,
राज्य परिवहन मंडळ कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन मंडळ कार्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. निर्णयाची प्रत जोडलेली नाही. |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे

ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तमराव किशनराव जाधव,६१५,अरुणोदय कॉलनी सिडको,एन-५,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय लेखाधिकारी, राज्य परिवहन मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,<br>बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपीलकर्ता<br>रा. एन-६, सिडको ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी<br>संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, साईनगर,<br>एन-६, सिडको, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :<br>संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, साईनगर,<br>एन-६, सिडको, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किशोर भिकनसिंग राजपूत | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, साईनगर, एन-६, सिडको, औरंगाबाद - प्रतिनिधी - लेखाधिकारी, श्री. धनंजय जोशी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, साईनगर, एन-६, सिडको, औरंगाबाद - श्री. शिंदे उ. ओ. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०५-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०६-२००८ फेरसादर दिनांक ०१-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, त्यांचे महाविद्यालय हे २१ वर्षापासून विनाअनुदानित आहे त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ त्यांना लागू होत नाही. अपिलार्थीने एकूण १३ मुद्दयांवर माहिती मागितली आहे त्यापैकी शासनाच्या कार्यालयाशी किंवा शासनाशी संबंधित ज्या कागदपत्रांची निर्मिती या महाविद्यालयाच्या संदर्भात झालेली आहे, ती सर्व कागदपत्रे देय होतात व त्याप्रमाणे ती अपिलार्थीस द्यावी लागतील व ती देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत त्यांनी ही बाब आयोगासमोर मान्य केली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, सिडको, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली व त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, रा. एन-६, सिडको ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, साईनगर, एन-६, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय, साईनगर, एन-६, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण महेपती हरण, : अपीलकर्ता
रा.सावरखेडा, ता.जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
पोलीस स्टेशन,
बासंबा, ता.जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली (शहर) - श्री. एल. एम. वडजे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. तथापि माहिती अपूरी व चुकीची आहे असे कारण दर्शवून अपिलार्थीने दि. १२.०४.२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०७.०५.२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, "जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली शहर यांनी या कार्यालयास सादर केलेली माहितीची छायांकित एक प्रत आपणास देण्यात आली आहे. आपण स्वाक्षरी पण केली आहे व आपले समाधान झाले आहे व निरसन झाले बाबत समक्ष कळविले आहे." या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना खोटी माहिती मिळाली आहे, असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. अपिलार्थी आज सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि आज आयोगासमोर करण्यात आलेला युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण महेपती हरण, मु.पो.सावरखेडा, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली (शहर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी, :
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अपिलामध्ये नमूद केले आहे की, त्यांना माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिली आहे. त्याचप्रमाणे व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, अपिलाची सुनावणी होऊनही अपील निर्णयाची प्रत न मिळाल्यामुळे त्यांनी व्दितीय अपील दाखल केले आहे. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीअभावी या अपिलाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेतल्याचे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांना तात्काळ प्रथम अपील निर्णयाची प्रत देण्याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या अपिलांमध्ये माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिली असल्याचे मोघमपणे नमूद केले आहे. त्याकरिता अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिली ही बाब कळवावी व त्यावर १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती पुरवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाच्या स्तरावर अपील निकाली काढण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तम दगडूजी बगाटे, | : | अपीलकर्ता |
| रा. हिंगोली | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| पंचायत समिती, हिंगोली | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पं.स.हिंगोली - श्री. धनंजय पांडे, | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली - डॉ. विशाल राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी सांगितले केले की, अपिलार्थी यांनी दि. २७.०४.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये एकूण सात मुद्यांवर विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे. ती त्यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस प्रत्यक्ष पहाणी करण्याकरिता उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०६.२०१० रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती त्याच दिवशी म्हणजे दि. २३.०६.२०१० रोजी सुनावणीच्या दरम्यान दाखविण्यात आली व त्यापैकी अपिलार्थी यांनी मागितलेल्या एकूण ३१ पृष्ठांच्या छायाप्रती देण्यात आलेल्या आहेत. याबाबतची नोंद प्रथम अपिलाच्या या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना प्राप्त झालेली माहिती अपुरी आहे, असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडूजी बगाटे, सिध्दार्थनगर,दुध डेअरी, हिंगोली,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पं.स.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, : अपीलकर्ता
दुय्यम निबंधक कार्यालय परिसर, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार तथा दंडाधिकारी, तहसील कार्यालय, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६७

२ सुनावणीची तारीख दि. २८-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली - श्री. यु. आर. बोथीकर

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली
- प्रतिनिधी - श्री. एन. एम. शिंदे, अ. का.

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०६-०५-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०६-०५-२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या नस्तीची छायांकीत प्रत मागितली आहे. तसेच १९९० ची कागदपत्रे मागितली आहेत. तथापि अशा प्रकारची नस्ती त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही आजपर्यंत उपलब्ध होऊ शकली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, वसमत मार्फत आवक जावक रजिस्टरची छाननी करण्यात आली तथापि सन १९९० च्या आवक जावक रजिस्टरमध्ये या माहितीची नोंद आढळून आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, १९९० सालच्या आवक जावक रजिस्टरची छायांकीत प्रत त्यांनी उपलब्ध करुन घेतली असून ती ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थीला माहिती देण्याचा त्यांनी दिनांक २३-११-२०१० ला प्रयत्न केला. तथापि अपिलार्थीने आवक जावक रजिस्टरची सत्यप्रत घेण्यास इनकार केला.

या प्रकरणी त्रयस्थ पक्षास त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्याचे आयोगास आढळून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जी कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत यांच्याकडे उपलब्ध आहेत जी त्यांनी आयोगास दाखविली ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालय परिसर, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे,<br>रमाई, ए-९५७, अशोकनगर, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>उप विभागीय कार्यालय, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली - श्री. डी. डी. फुफाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. एन. एम. शिंदे, अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३१-०३-२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये एकंदर १२ मुद्यांवर मौजे कनेरगाव येथील स्वस्त धान्य दुकानदार तसेच त्यांनी वाटप केलेले धान्याबाबत व केरोसीन दुकानदार यांनी वाटप केलेल्या केरोसीन व इतर दस्ताऐवजाविषयी विस्तृत अशी माहिती मागितली आहे. यापैकी बरेच मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्यामुळे माहिती या संज्ञेत मोडत नाहीत व तसेच ही माहिती एकत्रित करण्यास त्यांना काही कालावधी लागला. तथापि यामागे त्यांची असद्‌भावना नाही. आज रोजी त्यांच्याकडे सर्व मुद्दयांवर माहिती उपलब्ध आहे व ती ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः मागितली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

अपिलार्थीने व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे, रमाई, ए-९५७, अशोकनगर, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तातेराव रामजी जाधव, : अपीलकर्ता
रा. सुरजखेडा, पो. कडोळी, तालुका सेनगांव,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,<br>हिंगोली - श्री. आसाराम सूर्यभान लांडे पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १०-०५-२०१० रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या मालकीच्या घराच्या संबंधात केलेल्या दिनांक ०५-०४-२०१० रोजीच्या अर्जासंदर्भातील माहिती पंचायत समिती, सेनगांव यांच्याकडे उपलब्ध असल्याने अपिलार्थीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) अन्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव यांच्याकडे वर्ग करण्यात आला व ही बाब अपिलार्थीस कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी सुनावणी घेतली आहे आणि या सुनावणीमध्ये वरील बाबींची नोंद घेऊन पुढे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना असे आदेशित केल्याचे आढळून येते की, संबंधित यंत्रणेकडून माहिती हस्तगत करुन अपिलार्थीस सदर आदेश पारीत झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी लागेल.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांना ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव यांच्याकडून प्राप्त झाली नाही. याकरिता या प्रकरणात निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना व्यक्तिशः लक्ष द्यावे लागेल. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस द्यावी लागेल. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव यांनी पंधरा दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी वर नमूद केल्याप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव यांनी पंधरा दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तातेराव रामजी जाधव, रा. सुरजखेडा, पो. कडोळी, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश ईरन्ना चौधरी, : अपीलकर्ता
रा. गाडीपुरा, तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लिपिक, नगर परिषद, हिंगोली<br>- श्री. भगवान आश्रोबा जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली<br>-प्रतिनिधी - श्री. विनय साडू | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांचे प्रतिनिधी<br>- श्री. कांबळे जी. एस., जिल्हा प्रकल्प अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी नगर परिषद हिंगोली यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०३-०७-२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०८-२०१० रोजी देण्यात आली आहे व अपिलार्थी यांनी ती स्विकारली आहे आणि त्याची पोचही अपिलार्थीने दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश ईरन्ना चौधरी, रा. गाडीपुरा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगर परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी,<br>दुय्यम निबंधक कार्यालय, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>निवडणूक विभाग, तहसील कार्यालय, वसमत,<br>तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, निवडणूक, तहसील कार्यालय, वसमत,<br>तालुका वसमत, जिल्हा हिंगोली - श्री. यु. आर. बोथीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली<br>-प्रतिनिधी - श्री. एन. एम. शिंदे, अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २२-०५-२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली होती व पुन्हा याच त्रयस्थ पक्षाची अन्य अर्जान्वये दुसरी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी "त्यांच्या विरुध्द आलेल्या तक्रार अर्जाबाबत कोणती कार्यवाही केली " अशी माहिती मागताना ०१ मार्च २०१० ते आजपर्यंत असा मोघम कालावधी नमूद केला आहे. त्याचप्रमाणे केलेल्या तक्रारीचा तपशील इत्यादी दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे तथापि जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष श्रीमती प्रेमलता मठपती यांच्यासंदर्भात व्यक्तिगत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. याकरिता त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील परंतुकानुसार व्यापक जनहिताचा मुद्दा विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, निवडणूक विभाग, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७३

२ सुनावणीची तारीख दि. २८-०२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली
- प्रतिनिधी - श्री. डी. डी. फुफाटे, नायब तहसीलदार

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. एन. एम. शिंदे, अ. का.

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०४-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०५-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख १४-०६-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २१-०४-२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये साईसेवा गॅस एजन्सीबाबतची मोठ्या प्रमाणावर विस्तृत व मोघम अशी सन १९९६ ते २०१० या कालावधीची माहिती मागितली आहे. संबंधित त्रयस्थ पक्षाकडून माहिती मिळविण्याकरिता तहसीलदार, वसमत यांच्याकडून प्रयत्न करण्यात आलेले आहेत तथापि आतापर्यंत संपूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी तसेच तहसील कार्यालय पुरवठा, वसमत यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. त्याचप्रमाणे संबंधित एजन्सीकडून माहिती मिळावयास उशीर का लागत आहे याची चौकशी तहसीलदार यांना करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीसंदर्भातील सर्व उपलब्ध अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-०२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अ. लतीफ कुरेशी,<br>रा. आखाडा बाळापूर, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय, कळमनुरी, जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळमनुरी, जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, नगरपरिषद, कळमनुरी, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळमनुरी, जि.हिंगोली- श्री. बोंदर सुंदर आत्माराम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी सांगितले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांनी अन्य अर्जान्वये लोकशाही दिनामध्ये मागणी केलेली होती. त्यावर जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. दोनही अर्जाचे विषय सारखेच आहेत. अपिलार्थी यांच्या दि. ०५.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, कळमनुरी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अ. लतीफ कुरेशी, रा. आखाडा बाळापूर, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, कळमनुरी, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शफीखखॉ उमरखॉ,<br>कळमनुरी, जि. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, कळमनुरी जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, कळमनुरी जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, कळमनुरी, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी, जि.हिंगोली - श्री. बोंदर सुंदर आत्माराम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले की, अपिलार्थी यांच्या दि. २८.०६.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपोटी शुल्क रु. १२/- इतके भरुन माहिती हस्तगत करावी, असे मुख्याधिकारी, न.प.कळमनुरी यांनी त्यांच्या दि. २७.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे.ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झ ाली आहे तथापि प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे, या कारणास्तव त्यांनी प्रथम अपील सादर केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला आहे की, अपिलार्थीस मागितलेली माहिती नगर परिषद कार्यालयात उपलब्ध संचिकेचे निरीक्षण करुन घेता येईल व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संचिका उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः कार्यालयास उपस्थित राहून कागदपत्रांची पहाणी केली नाही, असे आज युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे सांगितले. तथापि उर्वरित माहिती अपिलार्थीस दि. ०६.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. याबाबतची अपिलार्थीची पोच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.१०.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये पाच मुद्यांवर माहिती प्राप्त झाली नाही, असे नमूद केले आहे. सदरची माहिती मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये अंतर्भूत असल्यास त्यापैकी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती वगळता इतर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल व ही बाब मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी यांना पहावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, कळमनुरी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या पाच मुद्यांबाबतची माहिती अपिलार्थीस तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शफीखखॉ उमरखॉ, रा. जुने बसस्टॅण्ड, नाका नंबर २, कळमनुरी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, कळमनुरी, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख नईम शेख लाल,<br>रा. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख नईम शेख लाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा) - श्री.डी.डी. फुफाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली - प्रतिनिधी श्री. शिंदे एम.एन., अव्वल कारकुन (म). | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०१.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले की, त्यांनी त्यांच्या दि. ०१.०७.२०१० रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्यापही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीस देण्यासाठी माहिती उपलब्ध आहे. आयोगाने सूचना केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस हस्तांतरित करावी. अपिलार्थी यांनी या माहितीची पहाणी करावी व यामध्ये त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भाने काही त्रुटी आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवाव्यात. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यानुसार माहिती पुरवावी लागेल.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. या विलंबाकरिता संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) व या प्रकरणाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत. आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिनियमातील कलम २०(१) नुसार एकत्रित शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी यांना तीस दिवसांच्या आत आयोगास सादर करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी जे अपिलार्थीस माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबास जबाबदार आहेत, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) नुसार रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटण,हिंगोली ता.जि.हिंगोली

२.	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र बळीराम मोरे, : अपीलकर्ता
रा.साळेगाव ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, रुपुर ता.कळमनुरी,जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांना दि.०५.०८.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. ०६.०९.२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.कळमनुरी, जि.हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०९.२०१० रोजी ग्रामसेवक, ग्रामपंचायत रुपुर, ता.कळमनुरी यांना अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती नियमानुसार देण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,रुपुर यांनी अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे दि. ०३.०९.२०१० रोजी अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून माहिती घेऊन जाण्यास कळविले आहे. तदनंतर दि. १२.०९.२०१० रोजी अपिलार्थीस पुन्हा कळविण्यात आल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना द्वितीय अपिलावरुन माहिती मिळाली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपुरी व चुकीची माहिती देऊन दिशाभूल केली आहे, असे अपिलार्थीने मोघम नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती अपुरी व दिशाभूल केलेली वाटत आहे, याबाबत जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावे लागेल.तदनंतर जन माहिती अधिकारी यांना उर्वरित परिपूर्ण माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत द्यावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता प्रस्तुत प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. साळेगाव, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय रुपुर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कळमनुरी, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोरे रविंद्र बळीराम, : अपीलकर्ता
रा. सालेगाव, ता. कळमनुरी, जि.हिंगोली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, तथा प्रकल्प संचालक, : उत्तरवादी
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी सन २००६ ते २००९ या कालावधीच्या दरम्यान सालेगाव व नांदापूर सर्कल, ता. कळमनुरी मधील राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना व इंदिरा आवास घरकुल योजनेबाबत विस्तृत स्वरुपाची माहिती व्यक्तिशः मागितली असल्याचे त्यांच्या दि.७/५/२०१० रोजीच्या मूळ अर्जावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर दि. ०१.०६.२०१० रोजी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांना अपिलार्थीस माहिती परस्पर देण्यात यावी,असे सूचित केले असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी दि. १९.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे संबंधित गट विकास अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याबाबत पुन्हा कळविले आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. तरी गट विकास अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील. या पहाणीसाठी त्यांनी एक दिवस (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) सुनिश्चित करावा व त्यासंदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोरे रविंद्र बळीराम, रा.सालेगाव, पो.सांडस, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तम दगडूजी बगाटे,<br>रा. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पं.स.हिंगोली - श्री. धनंजय पांडे, | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली - डॉ. विशाल राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २१.०७.२०१० व २८.०७.२०१० रोजी केलेल्या द्वितीय अपिलाशी संबंधित माहितीसाठीचा मूळ अर्ज एकच आहे. अपिलार्थीच्या दि.२१.०७.२०१० रोजीच्या द्वितीय अपील क्र. २६६/१० या प्रकरणात आयोगाने दि.२८.०२.२०११ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला असल्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपिलावर वेगळयाने विचार करण्याची आवश्यकता नसल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडूजी बगाटे, सिध्दार्थनगर,दुध डेअरी, हिंगोली,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पं.स.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>रा.वसमत, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, वसमत, जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली- श्री. यु.आर. बोथीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली- प्रतिनिधी - श्री. एम.एन.शिंदे, अव्वल कारकुन(म.) | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०४.२०१० रोजीच्या अर्जान्वये त्रयस्थ पक्ष साईसेवा गॅस एजन्सीच्या ११८/२/डी या स.नं. एन.ए. तसेच लेआऊट बाबतच्या साक्षांकित प्रती मागितल्या आहेत. या प्रती त्यांच्या कार्यालयात म्हणजे तहसील कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नाहीत. याबाबत त्यांनी दि. २९.०४.२०१० रोजी त्रयस्थ पक्षास संबंधित कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याकरिता कळविले आहे. तसेच अपिलार्थीस सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे दि. २७.०६.२०१० रोजी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, सदरची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकते. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे वर्ग करावयास हवा होता. हे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. तरी अपिलार्थी यांना ही माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामधील संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या दि. २६.०४.२०१० चा मूळ माहितीचा अर्ज विचारात घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०४.२०१० रोजीच्या मूळ अर्जाशी संबंधित माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, असे पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, वसमत, जि. हिंगोली  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, : अपीलकर्ता
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष श्रीमती प्रेमलता मठपती यांच्यासंदर्भात व्यक्तिगत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे.

याकरिता त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील परंतुका नुसार व्यापक जनहिताचा मुद्दा विचारात घेऊन त्रयस्थ पक्षांशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदींचा विचार करुन हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ, देशपांडे पेट्रोलपंपाजवळ, वसमतनगर, जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रविंद्र बळीराम मोरे,<br>रा. सालेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. शिवाजी पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २९-०६-२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडील एकूण पाच मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती सन २००१ ते २०१० या कालावधीची मागितली आहे. ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेणार होते. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती एकत्रित करण्यासाठी काही वेळ लागला व यानंतर दिनांक ०१-१०-२०१० रोजी अपिलार्थीस एकूण ३२ पृष्ठांची माहिती पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती मिळाल्याचे आज रोजी आयोगास सांगण्यात आले आणि आयोगापुढील कागदपत्रांवरुनही तसे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. सालेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपीलकर्ता
मंगळवारा बाजार, हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लिपिक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली<br>- श्री. आनंद व्दारकादासजी दायमा | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली - प्रतिनिधी<br>- श्री. व्ही. एम. शाहु, लिपिक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहिती अर्जाच्या संदर्भात दिनांक १३-०१-२००९ रोजी माहितीकरिता रुपये २० इतक्या शुल्काचा भरणा कार्यालयात करुन माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्याचे कळविण्यात आले होते. अपिलार्थीने दिनांक २७-०१-२००९ रोजी पावती क्रमांक ३१५३० अन्वये रुपये २० चा कार्यालयात भरणा केला. यानंतर अपिलार्थीस त्याच दिवशी माहिती देण्यात आली. अपिलार्थीने माहिती समाधानकारक नाही म्हणून, मुद्दा क्रमांक ४ ची माहिती न दिल्यामुळे व मुद्दा क्रमांक १ ची माहिती अपुरी दिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. दिनांक २२-०४-२००९ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती अधिकारी अस्थापना विभाग, नगर परिषद, हिंगोली यांनी जरी यापूर्वी सदरील माहिती देण्यात आलेली आहे तरी सुध्दा पुन्हा एकदा माहिती १५ दिवसाच्या आत देण्यात यावी, असे आदेशित केले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००९ रोजी संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व आयोगापुढे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष हरिभाऊ काशिदे,<br>जुन्या पाण्याच्या टाकीजवळ, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली - श्री. अविनाश शिंगटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०९-२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३-१०-२००८
फेरसादर दिनांक
०३-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये पुयना रोपवाटिका येथे २००४-०६ या कालावधीत झालेल्या गहू व तांदुळाच्या आवक व वाटपाबाबतची माहिती विचारली आहे. ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-१०-२००८ रोजी देण्यात आलेली आहे. उप विभागीय अधिकारी, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १६-०९-२००८ रोजी निर्णय देताना १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती पुरविण्यात यावी अशी त्यांच्या निणर्यात नोंद घेतली आहे व त्यानुसार माहिती दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोच अपिलार्थीने दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि अपिलार्थीस माहिती मिळाल्याचेआयोगास आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष हरिभाऊ काशिदे, जुन्या पाण्याच्या टाकीजवळ, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,

कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.